# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०६/०९/२०२६ ( रविवार )

---

## गोवंश जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ३८ गोवंश जनावरांची सुटका, ४ आरोपी अटक
## कन्हान पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कन्हान :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा आणि श्री शशांत एन. एम. सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांच्या नेतृत्वात कन्हान पोलीसांनी अवैधरीत्या गोवंश जनावराची वाहतूक करणाऱ्या आरोपीतांवर कारवाई करून एकुण ५४ लाख २० हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करून ०४ आरोपींना अटक केले आहे.**

दिनांक ०५/०९/२०२६ रोजी कन्हान पोलीस अवैध धंदयांवर कारवाई करणेकामी पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असता पेट्रोलींग दरम्यान गोपनिय बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गोवंश जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी बोर्डा टोल नाका नागपूर जबलपूर रोडवर नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान कंटेनर क्र एच आर —३८/व्ही —७३५३ येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबवुन तपासणी केली असता **१) मोहम्मद सलिम वल्द मुहम्मद हुसैन, वय ४४ वर्ष, रा. मंदारपूर ता. जि मंदसौर म.प्र ह.मु. सय्यद दर्गा इंदिरा कॉलनी २) आजाद वल्द युसुफ डेडवालिया, वय ३४ वर्ष, रा. रूपा रेल ता. जावद, जि. निमज म.प्र. ३) इब्राहीम हुसेन मंसूरी, वय ३८ वर्ष, रा. मंदारपुरा, ता.मंदसौर, मध्यप्रदेश ४) जाफर मुबारीक तांडया, वय ३० वर्ष, रा. मुलतानपूरा, ता. मंदसौर जि. मध्यप्रदेश** हे मिळुन आले. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये ३८ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अंत्यत कमी जागेत दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन निर्दयतेने वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले.

पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून कंटेनर क्र. एच आर –३८/व्ही –७३५३ किंमती ५०,००,०००/– रूपये आणि ३८ गोवंश जनावरे किंमती ३,८०,०००/– रूपये, ०४ मोबाईल असा एकुण किंमती ५४,२०,०००/– रूपयाचा मुददेमाल जप्त केला. नमुद प्रकरणी चारही आरोपी यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ३(५) भा. न्या.सं. सहकलम ११(१), (अ), (ड), (फ) प्राण्यांचा छळ अधिनियम १९६०, ५ (अ), (१), (२), ९ महा पशु सरक्षण अधि १९७६, सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. चारही आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.



# आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांचा रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ०६/०९/२०२६ रोजी आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणत्याही अनुचित परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्याच्या दृष्टीने नागपूर ग्रामीण जिल्हयात पोलीस स्टेशन वडोदा आणि मौदा, कोंढाळी, जलालखेडा च्या हद्दीत रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली. यावेळी पोलीस अधिकारी व अंमलदार ढाल, लाठी, हेल्मेट इत्यादी दंगा नियंत्रण साहित्याने सज्ज होऊन दंगा नियंत्रणाचा सराव करण्यात सहभागी झाले. तसेच पोलीस दलाची सज्जता, जलद प्रतिसाद क्षमता, पथकांमधील समन्वय तसेच उपलब्ध दंगा नियंत्रण साहित्याच्या हाताळणीचा सराव करण्यात आला.**

**पोलीस स्टेशन वडोदा** :– श्री. शशांत एन. एम., सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग यांच्या उपस्थितीत सहायक पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन वडोदा यांच्यासह वडोदा पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक आणि होमगार्ड यांनी वडोदा शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. सदर रूटमार्च पोलीस स्टेशन वडोदा, तिरंगा चौक, बाजार चौक, झेंडा चौक, सुंदरनगर, छत्रपती शिवाजी चौक ते परत पोलीस स्टेशन या मार्गाने घेण्यात आला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन मौदा** :– श्री. शशांत एन. एम., सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्हान विभाग यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री सारीन दुर्गे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांच्यासह मौदा पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांनी मौदा शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला. सराव पूर्ण झाल्यानंतर आगामी गणपती उत्सवाच्या पाश्र्वभूमीवर गणपती आगमन व विसर्जन मार्गांची पाहणी व निरीक्षण करण्यात आले.

**पोलीस स्टेशन कोंढाळी**:– श्री. पराग पोटे उपविभागीय पोलीस अधिकारी, काटोल विभाग यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री सुमित परतेकी, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कोंढाळी यांच्यासह कोंढाळी पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांनी कोंढाळी शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला. सराव पूर्ण झाल्यानंतर आगामी गणपती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणपती आगमन व विसर्जन मार्गांची पाहणी करण्यात आली.

**पोलीस स्टेशन जलालखेडा** :– सहायक पोलीस निरीक्षक श्री विनोद जांभळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन जलालखेडा यांच्यासह जलालखेडा पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियंत्रण पथक आणि होमगार्ड यांनी जलालखेडा शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. सदर रूटमार्च जलालखेडा येथील मुख्य रस्ता, बाजार चौक, बाजार लाईन तसेच बसस्थानक परिसरातून संचलन करण्यात आले. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**आगामी सणोत्सव शांततेत, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दल सज्ज असून, नागरिकांनीही सणोत्सव शांततेत साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.**








MAHARASHTRA
POLICE







## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलीसांनी घेतल्या प्रशासकीय बैठका, शांतता समिती तसेच आयोजकांच्या बैठका

**आज दिनांक ०५/०९/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात आगामी गणेशोत्सव तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सणोत्सव बंदोबस्त असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन येथे आगामी सणोत्सवांच्या निमित्य विविध बैठका घेण्यात आल्या.**

**पोलीस स्टेशन पारशिवनी :—** श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग रामटेक यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. तहसीलदार पारशिवनी, श्री. निखिल ढोले, प्रभारी मुख्याधिकारी, नगरपंचायत पारशिवनी

तसेच सहायक पोलीस निरीक्षक, श्री किशोर शेरकी प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन पारशिवनी यांच्या उपस्थितीत आगामी सणोत्सव संदर्भात पोलीस स्टेशन पारशिवनी हद्दीतील डीजे चालक व मालकांची बैठक घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन वेलतूर** :– पोलीस निरीक्षक श्री प्रशांत काळे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन वेलतूर यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन वेलतूर येथे आगामी सणोत्सव संदर्भात शांतता समितीचे पदाधिकारी तसेच डीजे चालक व मालक यांची स्वतंत्र बैठक आयोजित करण्यात आली.

**पोलीस स्टेशन मौदा** :– पोलीस निरीक्षक श्री सारीन दुर्गे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन मौदा यांच्या उपस्थितीत आगामी सणोत्सव संदर्भात मौदा पोलिस ठाणे हद्दीतील सर्व डीजे व धुमाल धारकांची बैठक घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन वडोदा** :– सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग श्री. शशांत एन. एम. तसेच सहायक पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन वडोदा यांच्या उपस्थितीत आगामी सणोत्सव संदर्भात वडोदा हद्दीतील सबस्टेशन वडोदा व गुमथळा येथील विद्युत विभागाचे उपअभियंता, अभियंते तसेच इलेक्ट्रिशियन यांची तसेच सर्व गणपती मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. तसेच पोळा सणाचे आयोजन करणारे व सहभाग घेणारे यांची सभा घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन पाचगाव :–** पोलीस निरीक्षक श्री रविंद्र मानकर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पाचगाव यांच्या उपस्थितीत आगामी सणोत्सव संदर्भात शांतता समितीचे पदाधिकारी तसेच डीजे मालक व चालक यांची बैठक आयोजित करण्यात आली.

**पोलीस स्टेशन बेला :–** सहायक पोलीस निरीक्षक श्री उमेश नासरे, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन बेला यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन बेला येथे आगामी सणोत्सव संदर्भात गणेश मंडळांचे अध्यक्ष व पदाधिकारी तसेच डीजे मालक यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन कोंढाळी :–** पोलीस निरीक्षक श्री सुमित परतेकी, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन कोंढाळी यांच्या उपस्थितीत पोलीस स्टेशन कोंढाळी येथे आगामी सणोत्सव संदर्भात गणपती मंडळांचे पदाधिकारी, डीजे मालक व शांतता समितीचे सदस्य यांची बैठक घेतली.

**सर्व आयोजकांना विनापरवानगी गणेशमूर्तीची स्थापना करू नये, मंडप उभारण्यासाठी आवश्यक त्या सर्व परवानग्या घ्याव्यात, महावितरणकडून विद्युत जोडणीसाठी आवश्यक परवानगी घ्यावी तसेच गणेश मंडपामुळे रस्त्यावरील वाहतुकीस कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या. तसेच आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच जातीय सलोखा राखुन सणोत्सव साजरा करावे असे अवाहन करण्यात आले. यावेळी आयोजकांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यात आल्या असून, त्यांचे आवश्यकतेनुसार संबंधित विभागांच्या समन्वयाने निराकरण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.**








श्री. संतोष गायकवाड म.पो.से.
विभागीय पोलीस अधिकारी, कन्हान
Nagpur Division


पोलीस स्टेशन पाचगांव




NIKE



# गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पारशिवनी येथे गणेश स्थापना मार्ग , विसर्जन मार्ग व विसर्जन स्थळाची करण्यात आली पाहणी

गणेश उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश स्थापना आणि विसर्जन मिरवणुकी दरम्यान वाहतूक कोंडी, गर्दी, अडथळे, वीजवाहिन्या, रस्त्यांची स्थिती तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित संभाव्य धोके आधीच ओळखून त्यावर योग्य उपाययोजना करता याव्यात, यासाठी दिनांक ०५/०९/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत गणेश स्थापना मार्ग, विसर्जन मार्ग तसेच विसर्जन स्थळाची पाहणी करण्यात आली.

पारशिवनी येथे सदर पाहणी श्री. प्रियेश महाजन, उपविभागीय अधिकारी, रामटेक विभाग तसेच श्री. रमेश बरकते, उपविभागीय पोलीस अधिकारी, रामटेक विभाग रामटेक तसेच यावेळी तहसीलदार पारशिवनी, श्री. निखिल ढोले, प्रभारी मुख्याधिकारी, नगरपंचायत पारशिवनी, सपोनि श्री किशोर शेरकी, प्रभारी अधिकारी, पारशिवणी पोलीस स्टेशन, उपअभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, पारशिवनी, सार्वजनिक बांधकाम विभाग पारशिवनीचे प्रतिनिधी तसेच यूसीएन केबल नेटवर्कचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

रस्ता तपासणीदरम्यान विसर्जन मिरवणुकीच्या मार्गावरील वाहतूक व्यवस्था, रस्त्यांची स्थिती, संभाव्य अडथळे, गर्दीची ठिकाणे, वीजवाहिन्या, प्रकाशव्यवस्था तसेच विसर्जन स्थळावरील आवश्यक सुविधांचा आढावा घेण्यात आला. स्थापना मार्ग, विसर्जन मार्ग तसेच विसर्जन स्थळाची पाहणी दरम्यान निदर्शनास आलेल्या बाबींवर तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना देण्यात आल्या. सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करून वाहतूक, सुरक्षा, वीज, स्वच्छता आणि नागरिकांच्या सोयीसुविधांबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले.





# अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ३८ हजार ५०० रूपयांचा मुद्देमाल जप्त कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर :– दिनांक ०५/०९/२०२६ रोजी कळमेश्वर पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, कळमेश्वर आठवडी बाजार येथे काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कळमेश्वर पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) बिसनलाल रामप्रसाद टेकाम, रा. खैरी लखमा कळमेश्वर २) लोकेश रमेश केळवदे, रा. वार्ड क्र. ०६, कळमेश्वर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम ५००/—रूपये, ०२ ॲडरॉईड मोबाईल, होंडा स्प्लेडर क्र एम एच ४० सी.जे. —८२९८ असा एकुण ३८,५००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०२ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

जनसंपर्क माहिती अधिकारी

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर